बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी, नागपूर द्वारा संचालित

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर जि. नागपूर

## एक दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय वेबिनार

विषय:— समकालीन वास्तव आणि मराठी ग्रामीण साहित्यः अनुबंध.

# अहवाल

## दिनांक:- १ जून २०२०

| मराठी विभाग प्रमुख | आय.क्यु.ए.सी. समन्वयक | प्राचार्य |
| --- | --- | --- |
| प्रा. डॉ. मधूकर नंदनवार | डॉ. मंगेश कडू | डॉ. जोबी जॉर्ज |

# भिवापूर महाविद्यालय भिवापूर, जि. नागपूर
## एक दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय मराठी वेबिनार

### विषय:— समकालीन वास्तव आणि मराठी ग्रामीण साहित्य: अनुबंध.

# अहवाल

भिवापूर महाविद्यालय भिवापूर च्या वतीने आय. क्यु. ए. सी. अंतर्गत मराठी विभागातर्फे एक दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय मराठी वेबिनारचे दि. ९जून २०२० रोजी यशस्वी आयोजन करण्यात आले. या वेबिनारचा अहवाल पुढीलप्रमाणे—

'समकालीन वास्तव आणि मराठी ग्रामीण साहित्य: अनुबंध'या विषयावर संपन्न झालेल्या मराठी वेबिनारकरिता महाविद्यालयातील आय. क्यु. ए. सी. अंतर्गत वेबिनारची पत्रीका व वेबिनारची सभासद नोंदणी लिंक तयार करुन दि. ७/६/२०२० ला टेलिग्राम ॲपच्या सहाय्याने प्रकाशीत करण्यात आली. त्यानूसार सदस्य नोंदणीकरिता मराठीच्या प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक, साहित्यप्रेमी व विद्यार्थ्यांनी भरभरुन प्रतिसाद दिला व नाव नोंदणी लिंकच्या माध्यमातून प्रतिनिधी नोंदणी करुन घेतली.

दि. ९/२/२०२० ला सकाळी ११.०० वा. मराठी वेबिनारला सूरूवात झाली. मा. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या अनुमतीने जेष्ठ प्राध्यापक डॉ. सुनिल शिंदे यांनी प्रथम प्रास्ताविकातून वेबिनारच्या विषयाचा थोडक्यात आढावा घेऊन वेबिनारला व सहभागी सदस्यांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर मराठी विभाग प्रमुख डॉ. मधुकर नंदनवार यांनी वेबिनारच्या आयोजनामागची भूमीका विशद केली. 'समकालीन वास्तव आणि मराठी ग्रामीण साहित्य: अनुबंध' या विषयावर हे वेबिनार घेण्यासंदर्भात सांगताना 'कोरोना व्हायरसच्या प्रादुर्भावामुळे माणसे लॉकडाऊन झाले आहेत. शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्यात आली असल्याने याचा परिणाम विद्यार्थी, शिक्षक आणि प्राध्यापक यांचे घनिष्ठ असलेले संबंध थोडेसे दुर्लक्षित झाले आहे. या लाकडाऊनचा सर्वात मोठा परिणाम हा तळहातावर घेऊन पोट भरणाऱ्या, कंपनीत काम करणाऱ्या, शेतात राबणाऱ्या व वणवण भटकत उदरनिर्वाह करणाऱ्या तसेच मजूर, श्रमीक, कामगार, कष्टकरी वर्गात मोडणाऱ्या ग्रामीण भागातील जनतेवर

Bhiwapur Mahavidyalaya * Bhiwapur, Distt. Nagpur *

झाल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. अशा या वास्तवाचा ग्रामीण साहित्यावर कसा व कोणत्या प्रकारचा प्रभाव पडणार आहे यावर चिंतन व मनन व्हावे या हेतून प्रेरीत होऊन हे ऑनलाईन वेबिनार आयोजित केल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर वेबिनारचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. शैलेंद्र लेंडे प्राध्यापक तथा विभागप्रमुख, स्नातकोत्तर मराठी विभाग रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर यांचा थोडक्यात परिचय डॉ. मधुकर नंदनवार यांनी करुन दिला.

मराठी वेबिनार 'समकालीन वास्तव आणि मराठी ग्रामीण साहित्य: अनुबंध' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख मार्गदर्शक डॉ. शैलेंद्र लेंडे, प्राध्यापक तथा विभागप्रमुख, स्नातकोत्तर मराठी विभाग रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर लाभले होते. डॉ. शैलेंद्र लेंडे यांचा सततचा अभ्यासाचा व्यासंग, चिंतन, मनन व अनेक पुस्तके लिहण्याचा अनुभव व नव्या पिडीतील धडाडीचे साहित्यिक, समिक्षक, विविध विषयावर अनेक व्याख्यानासाठी आमंत्रित वक्ते तसेच अनेक वेबिनारचे मार्गदर्शक डॉ. लेंडे यांनी विषयाचा यथोचित उलघडा करताना मराठी ग्रामीण साहित्याची सूरुवात म. फुले ह्यांच्या शेतकऱ्याचा असूड आणि गुलामगिरी या ग्रंथापासून झाली आहे. शेतकऱ्यांचे आणि ग्रामीण शेतमजूरांच्या प्रश्नांची मांडणी व सोडवणूक करण्यासाठी म. फुले यांनी प्रथम पुढाकार घेतला. म्हणून म. फुले हे ग्रामीण साहित्याचे जनक आहेत. शेतकऱ्याच्या हितासाठी सरकारने विविध योजना राबवून जसे संकरित वाण, खताचा पुरवठा,शेततळे यांत्रीक साधने, शेतीविषयक कार्यशाळा आयोजित करण्यात यावे. कोरोनाच्या प्रकोपाने माणसे लाकडाऊन झाली. त्यांच्यात भय निर्माण झाला. रोजगार बंद पडले. भूकेचा प्रश्न भेडसावू लागला. लोक विस्थापीत झाले. शहरातून गावात परतणाऱ्या माणसाकडे गावातील लोकांचा दृष्टिकोन बदलला. म. गांधीजींनी जे खेडयाबद्दल स्वप्न पाहिले होते ते पूर्ण झाले नाही. रोजगार हमी योजना, संजय गांधी निराधार योजना इ. योजनेमुळे शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाही. त्यांना संवैधानिकतेच्या आधारे मदत करायला हवी. ग्रामीण लोकांचे जगणे कठीण झाले आहे. मराठी साहित्यात लेखकाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांची मांडणी करून त्यांच्या दु:खाना वाचा फोडण्यासाठी सकस लेखन होणे आवश्यक असल्याचे वर्तवून वर्तमान स्थिती व मराठी ग्रामीण साहित्याचा संबंध विशद करतांना आजवरच्या ग्रामीण साहित्यात कविता, कथा, कादंबरी यांच्यात ग्रामीण जीवनाचे चित्र रेखाटले गेले. परंतु कोरोनाच्या काळातील व कोरोनोत्तर काळात हे चित्रण वेगळया अंगाने रेखाटले जाईल, शेतकरी, शेतमजूर, स्त्रिया, मजूर, भटके विमुक्त समाजातील लोकांचे जगणे कठीण झाले आहे अशांचे ग्रामीण मराठी साहित्यात समकालीन वास्तवाचे प्रतिबिंब उमटले जाणार असल्याचे सांगून साहित्यात खरे वास्तव दर्शन अधोरेखीत होणार असल्याचे सांगीतले.

Bhiwapur Mahavidyalaya * Bhiwapur, Distt. Nagpur *

ऑनलाईन मराठी वेबिनारला सुमारे *१७०च्या* वर सदस्यांनी ऑनलाईन टेलिग्राम लिंकच्या आधारे नोंदणी केली *तर ८०च्या वर* सदस्यांनी ऑनलाईन झूम ॲपव्द्वारे प्रत्यक्ष मार्गदर्शनाचा लाभ घेतला. शेवटी समन्वयक मराठी विभग प्रमुख डॉ. मधुकर नंदनवार यांनी संस्थचे, महाविद्यालयाचे प्राचार्य, आय. क्यु. ए. सी. टीम, तांत्रिक बाजू सांभाळणारे, प्रमुख मार्गदर्शक व सहभागी सर्व प्राध्यापक, अभ्यासक, विद्यार्थी या सर्वांचे आभार मानले.

सबंधित आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्षा मा. सुमनमाला मुळक, संस्थेचे सचिव मा. राजेंद्रजी मुळक यांचे मिळालेले प्रोत्साहन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांचे मार्गदर्शन लाभले. बी. सी. वाय. आर. सी या संस्थेच्या नागपूर पॉलीटेक्निक नंदनवन नागपूर येथील कार्यालयातून टेलीग्राम ॲपव्द्वारे झूम ॲपच्या प्रसारातून घेतलेल्या या वेबिनारचे प्रास्ताविक डॉ. सुनिल शिंदे यांनी केले व वेबिनारला शुभेच्छा दिल्या. डॉ. मधुकर नंदनवार यांनी वेबिनार घेण्यामागची भूमिका विशद केली. या वेबिनारला महाविद्यालयातील आय. क्यु. ए. सी. च्या सहभागाने समन्वयक डॉ. मंगेश कडू नॅक समन्वयक डॉ. विनिता विरगंधम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. वेबिनारची तांत्रिक बाजू प्रा. योगेश मोरे व प्रा. नदीम शेख यांनी सांभाळून महत्वाचा हातभर लावला. या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

धन्यवाद।


| मराठी विभागप्रमुख | आय.क्यु.ए.सी समन्वयक | प्राचार्य |
|---|---|---|
| डॉ. मधुकर नंदनवार | डॉ. मंगेश कडू | डॉ. जोबी जॉर्ज |

Bhiwapur Mahavidyalaya * Bhiwapur, Distt. Nagpur *

## राष्ट्रीय वेबिनारमध्ये मार्गदर्शन करतांना डॉ. शैलेंद्र लेंडे




## संचालन व आभार करतांना प्रा. डॉ. मधुकर नंदनवार




Bhiwapur Mahavidyalaya * Bhiwapur, Distt. Nagpur *

## Brochure:-

**Backward Class Youth Relief Committee's**

# Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur

Accredited with Grade 'B'
(CGPA-2.54) by NAAC, Bengaluru
ISO 9001:2015



Internal Quality Assurance Cell (IQAC), Bhiwapur Mahavidyalaya

Organizes

## National Webinar (Marathi)

on

## समकालीन वास्तव आणि मराठी ग्रामीण साहित्यः अनुबंध

**9 June 2020**

### Our Patrons



Hon. Smt. Sumanmala B. Mulak
Chairperson



Hon. Shri. Rajendraji Mulak Ex. Minister of State (Govt. of Mah.)
Secretary

BCYRC & BMCT

### Eminent Speaker



**Dr. Shailendra Lende**
**Professor and Head,**
**PG Department of Marathi,**
**R.T.M.N.U., Nagpur**

**Topic: "समकालीन वास्तव आणि मराठी ग्रामीण साहित्यः अनुबंध"**

**9 June 2020 at 11.00 a.m.**

**Convener**
Dr. Jobi George
Principal

**Organizing Secretaries**
Dr. Mangesh V. Kadu
IQAC Coordinator & HoD Political Science

Dr. Vinita Virgandham
NAAC Coordinator

**Organizing Team**
Dr. Madhukar V. Nandanwar
HoD Marathi

**Technical Coordinators**
Prof. Ashish M. Talekar
Assistant Professor

Dr. Yogesh K. More
Assistant Professor

Prof. Najim Sheikh
Assistant Professor

### संकल्पना टाचण

बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी नागपूर व्दारा संचालित
भिवापूर महाविद्यालय भिवापूर, जि. नागपूर
मराठी विभागातर्फे
एक दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय मराठी वेबिनार

कोरोनाच्या सावटाखाली आज संपूर्ण जग वावरत असून जगाचे सर्व व्यवहार पूर्णतः बदलेले आहेत. एका शतकानंतर येणाऱ्या भयंकर आपत्तीस आपण सर्वच मानव गांभीर्याने सामोरे जात आहोत. समकालीन वास्तव काही वेगळ्याच मार्गाने वाटचाल करीत आहे. येणारे कोरोनोत्तर जग मात्र निश्चितच आमूलाग्र बदललेले असेल.शिक्षण व मराठी साहित्याच्या क्षेत्रातही परिवर्तन घडून येईल. मराठी ग्रामीण साहित्याला वेगळी कलाटणी मिळेल. मराठी भाषाप्रेमी, अभ्यासक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या संदर्भात नवीन तंत्रज्ञान आणि उपलब्ध झालेल्या अनेक संधी आत्मसात करणे गरजेचे राहील. त्यामुळे संस्थात्मक पातळीवर ऑनलाईन अध्यापनाबरोबर विविध पर्यायाने, सेमिनार, कार्यशाळा, परिसंवाद असे नियोजनबद्ध कार्यक्रमाचे आयोजन करावे लागतील. याच व्यापक दृष्टिकोनातून आमच्या भिवापूर महाविद्यालय भिवापूर मराठी विभागातर्फे एक दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले आहे. या वेबिनारमध्ये आपण सहभागी व्हावे.

### Program Schedule

**9 June 2020**
**11.00 a.m. to 12.00 p.m.**

**Inaugural**
**Welcome address**
**Introduction**
**Q&A Session**
**Vote of Thanks**

For registration please click link below

https://forms.gle/ydcoFY3jqD8Bx1Mb9

Webinar will be conducted on ZOOM App.

For further details please contact-

Dr. M. V. Nandanwar- 9423634015
Dr. M. V. Kadu- 9764339797 / 7276669797

**Note:**
Participation is free.
E-Certificates will be generated only on submitting feedback form.

Bhiwapur Mahavidyalaya * Bhiwapur, Distt. Nagpur *

PRINCIPAL
Bhiwapur Mahavidyalaya
Bhiwapur, Dist. Nagpur